# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/03/2023 (बुधवार) दुपार

---

## पोलीस शिपाई लेखी परीक्षा

सन २०२१ पोलीस शिपाई भरतीमध्ये पोलीस शिपाई पदासाठी लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा (मुंबई शहर वगळता) दिनांक ०२/०४/२०२३ रोजी सकाळी ०८.३० वा. घेण्यात येणार आहे. पोलीस शिपाई पदासाठी विविध घटकांत (मुंबई शहर वगळता) लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहे. सदर परीक्षा केंद्रावर उमेदवारांनी ०३ (तीन) तास अगोदर पोहोचणे आवश्यक आहे. यासंदर्भात उमेदवारांना काही अडचण /समस्या असल्यास त्यांनी संबंधित घटक प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

## माहिती अधिकाराबाबत विशेष सुचना

पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले जनमाहिती अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हे कार्यरत होते.

परंतु जनतेची होणारी गैरसोय आणि माहिती मिळविण्यासाठी लागणारा वेळ व पैसा हे लक्षात घेता या मध्ये बदल करून सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हे जनमाहिती अधिकारी असतील तसेच संबंधीत उपविभागीय पोलीस अधिकारी हे प्रथम अपिलिय अधिकारी राहतील.

व पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखा प्रमुख हे जनमाहिती अधिकारी व पोलीस उपअधीक्षक (गृह.) नागपूर ग्रामीण हे प्रथम अपीलीय अधिकारी राहतील.

सदर चे आदेश हे दिनांक ०१/०४/२०२३ पासुन अंमलात येईल याबाबत नागरिकांनी नोंद घ्यावी.

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. खापा**:— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अप. क्र. ३३/२०१९ कलम ३५४(ड) भांदवि. सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी/पिडीता वय १३ वर्ष ही अल्पवयीन मुलगी शाळेत जाण्याकरीता बस स्टॉपजवळ उभी असता यातील आरोपी नामे— **अंकलेश श्रावणजी तायवाडे वय २० वर्ष रा. कोंदेगाव ता. सावनेर** याने पिडीतेला मी तुझ्यावर बलात्कार करून टाकीन असे बोलुन तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरण्याचे तपास सपोनि. सोनाली रासकर, पोस्टे सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २९/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम १२ पोक्सो मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व २०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद तसेच कलम ३५४(ड) भादंवि. मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व २०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मपोना/१७१७ वर्षा पोस्टे खापा यांनी मदत केली आहे.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. केळवद**:— फिर्यादी नामे— पोशि/२०१३ अमोल बबनराव काळे, वय ३३ वर्ष, पोस्टे केळवद यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे अप. क्र. ८५/१५ कलम ३५३, ३०७, ५०४, ५०६, ३४ भांदवि. सहकलम ३/२५ आर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी हा पोलीस स्टेशन केळवद येथे पोलीस शिपाई असुन फिर्यादीच्या घटना ता. वेळी व ठिकाणी दुर्गा विसर्जन बंदोबस्त करीत असतांना दुर्गा देवी मिरवणुकीत आरोपी नामे—१) संकेत उर्फ हरीदास सांगोळे, वय २० वर्ष, रा. मंगसा ता. सावनेर हा चाकु घेवुन धुमधाम करीत होता. फिर्यादी हा आरोपीस पकडण्यास गेला असता आरोपी क्र. २) नामे— पद्माबाई हरीदास सांगोळे, वय ४९ वर्ष, व ३) राजेंद्र संतोषराव बागडे, वय ४७ वर्ष यांनी सगनमत करून फिर्यादीस जिवे मारण्याच्या हेतुने पोटावर वार केले. फिर्यादीने स्वत:चा बचाव केला असता आरोपीने फिर्यादीच्या दोन्ही पायाच मांडीवर वार करून गंभीर दुखापत केली.

सदर प्रकरण्याचे तपास सपोनि योगेश पारधी पोस्टे केळवद यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २९/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ३२६ भांदवि. मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ५०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०५ महिने साधी कैद, कलम ३५३ भांदवि मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व ३०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद कलम ०७, ४/२५ (१—अ) आर्म ॲक्ट मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास ५०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०५ महिने साधी कैद तसेच कलम ३७ (१) (अ), १३५ (आय) मपोका ॲक्ट मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास १०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. आरोपी क्र. २) व ३) यांना निर्दोषमुक्त करण्यात आले आहे. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा/६८९ नरेश वरखडे पोस्टे केळवद यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**